ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारताच्या १९९१ च्या आर्थिक सुधारणांची परीक्षण

**डॉ. गोरक्षनाथ सानप[1], रुपवते राजश्री[2]**

[1] *संशोधन मार्गदर्शक, संगमनेर नगरपालिका आर्ट्स, डी. जे. मालपाणी कॉमर्स व बी. एन. सारडा सायन्स कॉलेज, संगमनेर.*

[2] *संशोधक विद्यार्थी, संगमनेर नगरपालिका आर्ट्स, डी. जे. मालपाणी कॉमर्स व बी. एन. सारडा सायन्स कॉलेज, संगमनेर.*

*Corresponding Author:* डॉ. गोरक्षनाथ सानप

**DOI - 10.5281/zenodo.14885672**

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्यानंतर भारतात समाजवादी समाज रचना हे धोरण मान्य केल्यावर जवळजवळ सर्व आर्थिक क्रियांवर सरकारचे नियंत्रण वाढत गेले १९५० ते १९८० या काळात कोणतीही आर्थिक क्रिया प्रारंभ करण्यासाठी सरकारचा परवाना आवश्यक ठरवण्यात आला.

हे धोरण १९९१ साली लागू करण्यात आले होते. भारताचे माजी पंतप्रधान व अर्थतज्ञ डॉ. मनमोहन सिंग या आर्थिक धोरणाचे प्रणेते मानले जातात. ३० वर्षापूर्वी २४ जुलै १९९१ ला खाजगीकरण, उदारीकरण, जागतीकिकरण या नव्या आर्थीक धोरणांची घोषणा झाली. आर्थिक धोरणांची चौकट बदलण्याची प्रक्रिया त्यापूर्वी अंदाजे एक दशक आधी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना सुरु झाली.

**नवीन आर्थिक धोरणाची उद्धीष्ट्ये:**

1) उच्च आर्थिक विकास दराकडे वाटचाल करणे आणि पुरेसा परकीय चलन साठा निर्माण करणे हा त्याचा हेतू होता.
2) जागतिकीकरणाच्या क्षेत्रात उतरवणे आणि बाजाराच्या अभिमुक्तेवर नवीन जोर देणे.
3) आर्थिक सुधारणा घडून आणने.
4) कृषी क्षेत्राचा विकास घडून आणने.
5) सेवा क्षेत्राच्या विकासास प्राधान्य देणे.

**संशोधन पद्धती:**

सदरील शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध पुस्तके,वर्तमानपत्रे,विविध चर्चासत्रे विविध शोधनिबंध व लेख तसेच शासकीय निमशासकीय आणि संशोधकांनी या विषयावर केलेल्या अभ्यसाचा वापर सदर शोधनिबंधामध्ये करण्यात आलेला आहे. सदर शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीवर असून वर्नात्मक पद्धतीवर अवलंबून असल्यामुळे वरील विविध ग्रंथ सामग्रीचा वापर करणे अपरिहार्य ठरते.

**नवीन आर्थिक धोरणाची पार्श्वभूमी:**

देशात १९९१ च्या आर्थिक सुधारणा या अन्वयार्थाने मोठ्या व अचानक, तत्कालीन वाटण्याची शक्यता आहे, पण तशा मोठ्या धोरणात्मक बदलाची प्राथमिक पाऊले १९८० – ८१ ते १९८४ – ८५ या ६ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पडलेली दिसतात. अर्थात, राष्ट्रीय योजना आयोगाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध म्हणून पंतप्रधान इंदिरा गांधी होत्या. त्यापूर्वी १९७० च्या दशकात नियंत्रित आदेशात्मक अर्थव्यवस्था अपेक्षित फलनिष्पत्ती देते नाही व बाजार व्यवस्थेचा आधार घेण्याची गरज आहे असा विचार मांडला जाता होता. देशाचे आर्थिक धोरण ठरविणाऱ्या प्रमुख नेत्यांमध्ये आर्थिक वैचारिकतेची मानसिकता, छुप्या पद्धतीचे बदलत चालली होती.

१९७१ च्या तेल ( इंधन ) किमतीच्या धक्क्यामुळे व्यापार तोलाची परिस्थिती अत्यंत नाजूक झाली त्यातून बहुतेक नेते व सल्लागार यांच्या हे लक्षात आले कि अखेरीस अटी मान्य करून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कर्ज घेऊन संकटातून बाहेर पडण्यास पर्याय नव्हता. १९८० मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधानपदी पुन्हा रुजू झाल्या. त्या काळात देशातील काही धोरणकर्त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधीना असे पटवून  दिले की अंतर्गत आर्थिक परिस्थितीने लादलेल्या मर्यादांच्या अनुशंगाने आवश्यक बदल करणे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अति मान्य करून धोरण बदल करण्यापेक्षा अधिक सोयीस्कर  ठरेल भारताने आर्थिक धोरणांची रूपरेषा तयार करून योग्य वेळी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे आवश्यक त्या मदतीसाठी जावे, अशी भूमिका प्रभावी ठरू लागली.




**उदारीकरण:**

**बाजार नियंत्रणे हटविणे:** उद्योगांवरील सरकारी नियंत्रण कमी करण्यात आले. "लाइसन्स राज" (License Raj) अंतर्गत ज्या उद्योगांना सरकारने परवाने दिले होते, त्यावर निर्बंध कमी करण्यात आले.

**नियमन कमी करणे**: अनेक उद्योगांना मुक्तता देण्यात आली, जसे की आयात-निर्यात सुलभ करणे, आणि अधिक कंपन्यांना विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सुधारित धोरणे लागू केली गेली.

**खाजगीकरण:**

सार्वजनिक क्षेत्रातील काही कंपन्यांचे खाजगीकरण )privatization) करण्यात आले, ज्यामुळे सरकारी कर्ज कमी होण्यास मदत झाली आणि कार्यक्षमता सुधारली.
सरकारने काही सार्वजनिक कंपन्यांचे भागधारकत्व खासगी क्षेत्राला विकले.

**जागतिकीकरण:**

भारताच्या १९९१ च्या आर्थिक सुधारणांमध्ये जागतिकीकरण (Globalization) हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक होता. १९९१ मध्ये भारताने आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया सुरू केली आणि या प्रक्रियेत जागतिकीकरणाचे प्रभावी धोरण राबवले. जागतिकीकरणामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला एका जागतिक स्तरावर प्रवेश मिळाला, आणि भारतीय उद्योगांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्याची संधी मिळाली. हे बदल भारताच्या दीर्घकालीन आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे ठरले.

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे भारतात विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी आपल्या पायाखाली भक्कम पाय रोवले. यामुळे भारतीय उद्योगांच्या व्यवस्थापन शैली आणि उत्पादनांच्या गुणवत्तेत सुधारणा झाली.
इतर देशातील कंपन्यांसोबत स्पर्धा करत असताना भारतीय कंपन्यांना आपल्या उत्पादनांची गुणवत्ता सुधारावी लागली, ज्यामुळे जागतिक बाजारपेठेत भारताची स्थिती अधिक मजबूत झाली.

**नवीन आर्थिक धोरणांचे परिणाम:**

१९९१ च्या आर्थिक सुधारणांमुळे भारताची आर्थिक स्थिती आणि नागरिकांचे जीवनमान या दोन्ही बाबतीत मोठे बदल झाले या सुधारणाचे काही प्रमुख परिणाम खालील प्रमाणे आहे.

**अ ) सकारात्मक परिणाम:**

1) उदारीकरण आणि खाजगीकरण: आर्थिक नियंत्रण शिथिल करून आणि खाजगी क्षेत्रात अधिक स्वातंत्र्य देऊन अर्थव्यवस्था वाढण्यास चालना मिळाली.
2) विदेशी गुंतवणूक : विदेशी कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी प्रोस्थाहन देण्यात आले ज्यामुळे नवीन उद्योग धंदे उभारले गेले आणि रोजगार वाढला.
3) तंत्रज्ञान: नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढला आणि त्यामुळे उत्पादकता वाढली.

**ब) नकारात्मक परिणाम:**

1) उपभोक्तावाद: नागरिकांच्या हाती अधिक पैसे आल्याने उपभोग वाढला आणि नवीन उत्पादने आणि सेवा उपलब्ध झाल्या
2) असमानता: सुधारणांमुळे सर्वच वर्गांना समान फायदे मिळाले नाहीत. शहरी आणि ग्रामीण भागातील असमानता वाढण्याची शक्यता आहे.
3) भ्रष्टाचार: खुले बाजार आणि अधिक स्वातंत्र्य यामुळे भ्रष्टाचार वाढण्याची श्यक्यता असते.

**१९९१ च्या आर्थिक सुधारणांचा परीक्षणाचा सारांश:**

१९९१ च्या आर्थिक सुधारणांनी भारताच्या अर्थव्येवस्थेवर दुर्गामी परिणाम केल. खाजगीकरण , उदारीकरण , जागतिकीकरण या तीन प्रमुख स्तंभावर उभी असलेली ही सुधारणा भारताला एक नवीन दिशा देण्याचा प्रयत्न होता.

१९९१ च्या आर्थिक सुधारणांनी भारताच्या अर्थव्येवस्थेत बदल घडवून आणला आर्थिक वाढ, विदेशी गुंतवणूक, उत्पादन आणि सेवक क्षेत्रातील वाढ हे या सुधारणांचे प्रमुख यश आहे. मात्र असमानता, रोजगार, शहरीकरण आणि पर्यावरणीय समस्या ही या सुधारणांची काही आव्हान आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1) ११ th economic Book
2) पुस्तके, मासिक अहवाल, वर्तमान पत्रे इ. त्याचबरोबर You tube, Chrome, Google, Chatgpt इ.
3) WWW.mpscacademy.com ( नवीन आर्थिक धोरण १९९१ )
4) hari-news.cdn.ampproject.org
5) testbook.com ( नवीन आर्थिक धोरण )
6) https:pudhari-news.cdn
7) WWW.Jagranjash.com
8) MR.quora.com ( १९९१ च्या काळातील जगतिकीकरण )
9) Byjus-com.translate.goog